**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 7.328**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.9 No.5** **May – June 2022**

# दौलताबाद किल्ला: मध्ययुगीन पुरातत्वीय स्थळ

**डॉ. रमाकांत शिवाजीराव शातलवार**
*Corresponding Author*- **डॉ. रमाकांत शिवाजीराव शातलवार**
**Email-** ramakantshatalwar@gmail.com

## प्रस्तावना

भारतीय युद्धशास्त्रात किल्ल्याचे महत्व अगदी प्राचीन काळापासुन मानले गेले आहे. इतिहासात महाराष्ट्र राज्य हे महत्वाचे राज्य होते. येथे असणाऱ्या पर्वत रागा, नैसर्गिक सुबता, आणि सुजलाम वैभव याचा कोणालही हेवा वाटेल असाच होता छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर त्यांचा अमात्य रामचंद्रपंत यांनी महाराजांची संपुर्ण राजनीति वर्णन केली आहे त्यामध्ये गडकोटाचे महत्व किती होते याबदल ते लिहीतात 'संपुर्ण राज्याचे सार ते दुर्ग गडकोटविरहित जे राज्य त्या राज्याची स्थिती म्हणजे अभ्रपटल न्याय आहे. गडकोट म्हणजे राज्याचे मुळ, गडकोट म्हणजे खजिना, गडकोट म्हणजे सैन्याचे बळ, गडकोट म्हणजे आपले वस्तिस्थळे, गडकोट म्हणजे सुखनिद्रागार किंबहुना गडकोट म्हणजे आपले प्राण रक्षण'[१] औरंगाबाद जिल्ह्यात दौलताबाद नावाच एक खेडेगात आहे हे गाव औरंगाबाद शहरापासुन वायव्येस १५ किमी आहे. या ठिकाणी एक डोंगरी किल्ला आहे. हा किल्ला देवगिरी किल्ला या नावाने ओळखला जातो. दौलताबाद या गावाचे प्राचीन नाव 'देवगिरी' असे होते. हा किल्ला डोंगरी किल्ल्यांचा प्रकार आहे. म्हणुन गिरिदुर्ग असे म्हणतात. मध्ययुगीन भारतातील हा एकमेव असा किल्ला आहे जिथे कोणालाही जिंकता आले नाही म्हणुन दक्षिणेचा सर्वात किल्लेदार किल्ला आहे.

## विषय निवडणेचा हेतु

प्रस्तुत विषय निवडणेचा हेतु मराठवाड्यातील पुरातत्वीय स्थळ दौलताबाद किल्ला यांचा अभ्यास करणे.

## गृहितके

१) दौलताबाद किल्ल्याचा ऐतिहासिक आढावा मांडणी करणे.
२) दौलताबाद किल्ल्यांचे महाराष्ट्राच्या इतिहासातील वास्तुकलेचा इतिहास मांडणी करणे.
३) प्राचीन, यादव, घराण्यांचे दौलताबाद किल्ल्यातील महत्व मांडणी करणे.

## संशोधन पध्दती

प्रस्तुत शोध निबंध करिता ऐतिहासिक संशोधन पध्दती उपयोग करुन, प्राथमिक व दुय्यम साधनाच्या आधारे, तसेच विविध वेबसाईट उपयोग करुन या विषयांची मांडणी केली जाणार आहे.

## दौलताबादाचा किल्ला: मध्ययुगीन पुरातत्वीय स्थळ

## देवगिरी किल्ला

महंमद तुघलक या दिल्लीच्या सुलतानाने इ.स. १३२७ मध्ये देवगिरी येथे आपल्या राज्याची राजधानी आणली. त्यावेळी देवगिरी तेथील धनदौलत पाहुन त्याने देवगिरीचे नाव दौलताबाद असे ठेवले 'कल्याणीला असलेल्या राजधानी भिल्लमने देवगिरीला हालवली आज तेच देवगिरी शहर आहे. भिल्लम पाचवा याने देवगिरीचा किल्ल्याच्या पायऱ्याशी एक नगर वसविले'[२] 'इ.स. ११८७ मध्ये यादव राजा भिल्लम पाचवा याने देवगिरीला आपल्या राज्याची राजधानी बनविली, यादव राजाच्या नावामध्ये 'देव' शब्द आढळतो. उदा. रामचंद्रदेव, हरपाळदेव, महादेव, शंकरदेव, यावरुन या किल्ल्यांचे नाव 'देवगिरी' असे नाव मिळाले असेल.'[३]

## किल्ल्यांचे भौगोलिक स्थान व महत्व

दौलताबाद हा एक शंखाकृती आकाराचा एक डोंगर आहे. हा डोंगर २१५ मीटर उंच आहे. हाच डोंगर अर्थात पर्वत प्राचीन काळात 'सुरगिरी' या नावाने ओळखला जात होता. उत्तर भारताकडुन दक्षिण भारताकडे जाणाऱ्या मार्गावर तो वसलेला आहे. त्यामुळे दक्षिणेचा पहारेकरी म्हणावे लागते. कारण उत्तर भारतातुन येणारे आक्रमण धोपून ठेवण्याचे सामर्थ्य या किल्ल्यात आहे. 'अल्लाउद्दीनने देवगिरी किल्ल्याला वेढा दिला देवगिरी हा अभेद्य किल्ला होता जमिनीपासुन ६४० फुट उंच असणाऱ्या किल्ल्याला वेढले'[४] 'दौलताबाद हे मध्यवर्ती स्थान होते, पुर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर भागात राजकीय नियंत्रण ठेवता येत होते. दक्षिण भारतातील विद्रोहाचा पराभव करण्याउदेशाने राज्यकारभारासाठी दौलताबाद किल्ला

आणि भौगोलिक दृष्ट्या सुरक्षित वाटत होता.'[५] या उदेशाने मुहम्मद बिन तुगलकाने इ.स. १२२६ ला राजधानी दिल्लीहुन दौलताबाद येथे नेण्याची योजना तयार केली.

**भुईकोट व डोंगरी किल्ल्याचे मिश्रण**

'देवगिरी किल्ला हा डोंगरी (२१५ मी उंच) किल्ला आहे वास्तुकलेचा आणि शिल्पकलेचा एक उत्कृष्ट नमुना म्हणजे दौलताबाद किल्ला गडाच्या भिंतीपासुन ते प्रवेश द्वार आणि तोफखाना या सर्वावर आपल्याला नक्षीकाम पाहायला मिळते, किल्ल्यावरिल बुरज आणि चांदमिनार हे देखील त्य काळातील वास्तुकलेच्या सौंदर्याचे दर्शन घडवितात.'[6] किल्ल्या पायऱ्याशी अंबरकोट, महाकोट, आणि कालाकोट याच्या आतील बाजुस, राजवाडे, मंदिरे, चांदमिनार, स्नानगृह, व विविध संताच्या कंबरी यासारख्या अनेक वास्तु पाहावयास मिळतात. किल्ल्याच्या पायथ्याचा परिसर म्हणजे भुईकोट किल्लाच होय.'[७]

**दौलताबाद किल्ल्याचे क्षेत्रफळ**

'दौलताबाद किल्ल्याचे क्षेत्रफळ ६००० मीटरचा वर्तुळकार आहे.'[८] देवगिरी किल्ल्याचे क्षेत्रफळ ९४ एकटर आहे. किल्ल्याची उंची २९७५ फुट इतकी आहे.'[९]

**दौलताबाद किल्ल्यांचे प्रवेशव्दार**

'दौलताबाद किल्ल्याला अंबरकोट, महाकोट, आणि कालाकोट असे तीन कोट आहेत. हे तीन कोट म्हणजेच किल्ल्यांची तटबंदी होय. अंबरकोट हा किल्ल्याचा सर्वात बाहेरिल कोट असुन अत्यंत महत्वाचा आहे. या कोटात असलेला दरवाजा हा किल्ल्यांचा मुख्य दरवाजा आहे. हा दरवाजा म्हणजेच प्रवेशद्वार पुर्वाभिमुख आहे. या प्रवेशद्वाराची रुंदी १० फुट आणि उंची १२ फुट आहे.'[१०] या किल्ल्यास एकुण सात प्रवेशद्वार आहेत. किल्ल्यात प्रवेश करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे अरुंद पुल आहे ज्यात एकाच वेळी दोन लोकांसाठी जास्तीत जास्त जागा आहे, अंबरकोट, महाकोट कालाकोट, परकोट या प्रत्येक कोटात एक-एक प्रवेशद्वार असुन महाकोटातील प्रवेशद्वाराच्या पुढे एकापुढे एक तीन प्रवेशद्वारे आहेत.

**दौलताबाद किल्ल्याचे खंदक**

भुईकोट किल्ल्याभोवती खंदक खोदला जात असे. परंतु डोंगरी किल्ल्यासोबती खंदक गरज नसते. कारण नैसर्गिक पर्वताचा, टेकडीचा उपयोग करुन घेतला जात असे. 'किल्ल्याभोवती असलेले खंदक १६ मीटर रुंद आणि १७ मी खोल आहे. खंदकाच्या तळापासुन वर ४० मीटर उंचीपर्यंतचा डोंगरकडा खोदुन काढला आहे.'[११]

**दौलताबाद किल्ल्यातुन मिळलेले अवशेष**

1. 'पहिला कालखंड हा यादवपुर्व असुन (१०-११ शतक) देवगिरी हे धार्मिक महत्वाचे स्थळ होते. तेथे सध्याच्या महाकोटाच्या जागी किमान बारा मंदिरे व पवित्र कुंडे होती या ठिकाणी धार्मिक स्थळाप्रमाणे व्यापारी केंद्र निर्माण झाले असावे. सिडनी टॉय व स्टुअर्ट पिगट या इविहासकारांनी महाकोटाच्या टेकडीवर बौद्ध वा राष्ट्रकुट शैलीचे अवशेष असावेत.
2. दुसरा काळखंड यादव काळाचा असुन (सन ११५० ते १३००) महाकोट भागात वसाहतीची वाढ झाली याच काळात महाकोटाची भिंत बांधण्यात आली. भुमिज शैलीची अनेक मंदिरे या काळात निर्माण झाली. या काळात टेकडीवर अनेक गुफा कोरल्या गेल्या त्या प्रामुख्याने शैवपंथीयांच्या असुन एक जैन गुंफा आहे.
3. तिसरा कालखंड (१३००-१३५०) हा यादव राजवटीचा अंत व खिलजी तुघलक या मुस्लिम आक्रमक राजवटीचा आहे. अल्लाउद्दीन खिलजीचा सैनापती मलिक कापुर याच्या आक्रमणाने देवगिरीच्या इतिहासाला कलाटणी मिळाली.
4. चौथा कालखंड हा मुहमंद बिन तुघलकाने देवगिरीला आपली राजधानी बनवण्याचे ठरवल्यानंतरचा आहे. जुन्या तटबंदीच्या जागी चुना व दगडांनी नवीन तटबंदी उभारण्यात आली. या तटबंदीला गोल बुरुज होते.
5. पाचव्या म्हणजे बहामणी कालखंडात (इ.स. १३५० ते इ.स. १४५०) दौलताबादचे खऱ्या अर्थाने बळकट लष्करी ठाण्यात रुपांतर झाले टेकडीवर बाले किल्ला तयार झाला पायथ्याशी खंदक खोदुन बनवण्यात आहे. अहमदशहा या बहामनी सुलमानाने इ.स. १४३५ चांदमिनार उभारला तसेच रंगमहाल उंची वाढण्यात आले.'[१२]

**निकर्ष**

ऐतिहासिक देवगिरी किल्ल्याच्या चौहोबाजुनी मोठमोठ्या तोफा संरक्षणाच्या दृष्टीने ठेवण्यात आल्या होत्या. मेंढा तोफ दुर्गा तोफ यांचा समावेश होता. या सह किल्ल्याच्या सात तटांवर प्रत्येक बुरुजावर मोठमोठ्या तोफा ठेवण्यात आल्या होत्या. महाराष्ट्रातील सात चमत्कारांपैकी एक आहे. प्राचीन वास्तु, आर्श्चयकारक कोरीव काम आणि हिरवळ यांच्या मध्ये वसलेला हा किल्ला आहे. दुर्गम, अतिसुरक्षित अंधारे बोगदे शत्रुची नकळत दिशाभुल करत, किल्ल्यात जागोजागी भुयारी मार्ग आहे. मध्ययुगीन भारतातील स्थापत्य कलेचा मराठवाड्यातील एक उत्कृष्ट आणि शक्तिशाली किल्ला होता. मध्ययुगीन भारतातील यादव,

खिलजी, तुघलक, मराठे, मुघल, निजाम किल्ल्याच्या अभ्यासातुन सामाजिक, राजकीय, आर्थिक जीवनाचा (७६०) वर्षाचा इतिहास उभा राहतो. युध्द पध्दती आणि युध्द कलेतील बारीक-बारीक गोष्टींचा आढावा या किल्ल्याच्या इतिहासातुन घेता येतो.

**संदर्भ**


1. डॉ. सोमनाथ रोडे (१९९९) मराठवाड्याचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स, प्रथम आवृती, औरंगाबाद, पु. २९२
2. discovermh.com
3. डॉ. अनिल कठारे, डॉ. शिवाजी पवार (२००८), मराठवाड्यातील किल्ले, अल्फा, पब्लिकेशन्स, नांदेड, पु. १९०
4. प्रा. प्रशांत देशमुख (२००३), भारताचा इतिहास, विद्याभारती प्रकाशन, प्रथम आवृती, लातुर, पु. १८०
5. कित्ता, पु. १८०
6. majhimarathi.com
7. डॉ. अनिल कठारे (२०१३), मराठवाड्याचा इतिहास, एज्युकेशनल पब्लिशर्स, प्रथम आवृती, नांदेड, पु. ४२३
8. कित्ता, पु. ४२५
9. inmarath.in
10. डॉ. अनिल कठारे (२०१३), मराठवाड्याचा इतिहास, एज्युकेशनल, पब्लिशर्स, प्रथम आवृती, नांदेड, पु. ४२८
11. कित्ता, पु. ४२८
12. marathivishwakosh.org